| MHKO050005872026 | अर्ज दाखल तारीख : १०/०२/२०२६<br>अर्ज नोंदणी तारीख : १०/०२/२०२६<br>अर्ज निकाल तारीख : १०/०८/२०२६<br>कालावधी : ००व. ०६म. ००दि. |
|---|---|

५वे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, इचलकरंजी यांचे न्यायालयात
**(**पीठासीन अधिकारी एम.एस.गावडे**)**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१८/२०२६
निशाणी क्र.१६/अ

१) प्रमोद सुरेश शिंगारे
वय वर्षे ३३, धंदा - नोकरी,
रा. मलाबादे नगर, चंदूर, ता.हातकणंगले,
जि. कोल्हापूर-४१६११६.
२) प्रविण सुरेश शिंगारे
वय वर्षे ३२, धंदा - नोकरी,
रा. वर नमूद पत्यावर.
} अर्जदार

विरुध्द

कोणीही नाही } वि.प.

अर्ज- भारतीय उत्तराधिकार अधिनियम, १९२५
मधील कलम २७२, २७६ प्रमाणे प्रोबेट मिळणेबाबत.

विधिज्ञ -
अर्जदार तर्फे विधीज्ञ – श्री. एस.बी. कुराडे

# न्यायनिर्णय
(दि. १० ऑगस्ट २०२६ रोजी जाहीर)

अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज कै.तातोबा भुजगोंडा पाटील यांनी दि.२६/११/१९९७ रोजी लिहून ठेवलेल्या मृत्युपत्राप्रमाणे प्रोबेट मिळणेकामी दाखल केला आहे.

<u>अर्जदारतर्फे मांडण्यात आलेली हकीगत खालीलप्रमाणे</u> -

२) अर्जासोबत दिलेल्या परिशिष्ट 'अ' मधील नमूद मिळकत कै.तातोबा भुजगोंडा पाटील यांची स्वकष्टार्जीत मालकी कब्जे वहिवाटीची मिळकत होती. सदरच्या मिळकती संदर्भात तातोबा पाटील यांनी दि. २६/११/१९९७ रोजी अर्जदाराच्या लाभात मृत्युपत्र लिहून ठेवलेले आहे. कै.तातोबा भुजगोंडा पाटील दि. ०५/०८/१९९८ रोजी चंदूर येथे मयत झाल्या असून सदरच्या मृत्युपत्रानुसार अर्जदार कायमस्वरूपी मालक झालेले आहेत. अर्जदाराने आपल्या अर्जात पुढे असे नमूद केलेले आहे की, सदरचे मृत्युपत्र हे पहिले व अंतिम मृत्युपत्र आहे.

३) अर्जदारचे कथनाप्रमाणे सदर मृत्युपत्रानुसार स्थावर मिळकत ही जिल्हा कोल्हापूर तालुका व पोट तुकडी हातकणंगले, पैकी इचलकरंजी नगरपरिषद हद्दीतील मौजे चंदूर गट नं.१९५/अ चे ७/१२ उता-याप्रमाणे एकूण क्षेत्र ११.००.०० हे. आर. चौ.मी. यापैकी भूखंड क्र.७८ क्षेत्र १३९ चौ.मी.

४) अर्जदाराने सदरचे मृत्युपत्र नि.३/२ वर दाखल केलेले आहे. मृत्युपत्रावरील साक्षीदार सुरेश शिनगारे व शिवाजी पुजारी यांना अनुक्रमे नि.१० तसेच नि.११ वर तपासले आहेत. अर्जदार प्रविण सुरेश शिनगारे याने त्याचे सरतपासाचे शपथपत्र नि.९ वर दाखल केल आहे. आपल्या अर्जामध्ये असे कथन केले की, मयत कै.तातोबा भुजगोंडा पाटील यांच्या मृत्युनंतर त्यांची पत्नी कै.शांताबाई तातोबा पाटील यांचा सांभाळ देखील अर्जदार क्र.१ व २ यांनी केला आहे. कै.शांताबाई तातोबा पाटील या दि.१२/१२/२०२२ रोजी मयत झाल्या आहेत. तातोबा पाटील व शांताबाई पाटील यांना कोणतेही मुलबाळ नव्हते व जवळचे नातेवाईक नव्हते. तातोबा पाटील व शांताबाई पाटील यांच्या मृत्युनंतर अर्जदार हे वर नमूद मिळकतीचे ७/१२ पत्रकी नाव लावणेकरिता संबंधित तलाठी कार्यालयात गेले असता सक्षम न्यायालयाकडून तसा आदेश आणणेबाबत अर्जदारास कळविले. सबब, प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

५) अर्ज, अभिलेखावर दाखल कागदपत्रे यांचे अवलोकन केले असता व अर्जदारातर्फे विधीज्ञांना युक्तिवाद विचारात घेतला असता, प्रस्तुत अर्जाच्या निर्णयार्थ खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित होतात, ते मुद्दे आणि त्यांचे कारणांसह निष्कर्ष खालीलप्रमाणे;

| क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | कै.तातोबा भुजगोंडा पाटील यांनी त्यांच्या हयातीत दि.२६/११/१९९७ रोजी अर्जदारचे लाभात मृत्युपत्रानुसार वर नमूद स्थावर मिळकतीबाबत मृत्युपत्र करुन ठेवल्याचे अर्जदारने सिध्द केले आहे काय ? | ...होकारार्थी |

| | | |
|---|---|---|
| २. | अर्जदार प्रोबेट मिळण्याच्या अनुतोषाचे हक्कदार आहे काय ? | ...होकारार्थी |
| ३. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

<u>कारणमिमांसा</u>

**६)** अर्जातील कथने सिध्द करण्याकरिता अर्जदार यांनी नि. ८ वर अर्जदार क्र. २ प्रविण शिनगारे यांचे सरतपासाचे शपथपत्र, नि. ११ वर अर्जदार क्र. १ प्रमोद शिनगारे यांचे सरतपासाचे शपथपत्र दाखल केलेले आहे. तसेच अर्जदारतर्फे सुरेश शिनगारे (सा.क्र.१), शिवाजी पुजारी (सा.क्र.२) यांनी त्यांची पुराव्याची शपथपत्रे अनुक्रमे (नि.क्र.९ व १०) वर दाखल केलेली आहेत. तसेच, अर्जदारतर्फे नि. ३ सोबत अ.नं. १ वर कै. तातोबा भुजगोंडा पाटील यांनी लिहून ठेवलेले मृत्युपत्र, नि. ३ सोबत अ.नं. २ वर तातोबा भुजगोंडा पाटील यांचा मृत्यु दाखला नि. ३ सोबत अ.नं. ३ वर शांताबाई तातोबा पाटील या मयत असलेबाबत पोलीस पाटील, मौजे चंदूर यांनी दिलेला दाखला, नि. ३ सोबत अ.नं. ४ वर मौजे चंदूर ता. हातकणंगले येथील गट नं. १९५/अ चा ७/१२ चा उतारा तसेच नि. ७ चे पुरसीस सोबत दै. नवसंदेश मध्ये प्रसिध्द केलेला जाहिरनामा इ. कागदपत्रे अभिलेखावर दाखल आहेत. अर्जदार यांनी नि.१२ कडे पुरशिस दाखल करुन पुरावा बंद केलेला आहे.

<u>कारणमिमांसा मुद्दा क्र. १ व २ करिता</u> **-**

**७)** अर्जदार यांनी त्यांच्या नावे दि.२६/११/१९९७ रोजी कै. तातोबा भुजगोंडा पाटील यांनी करुन ठेवलेल्या मृत्युपत्राच्या आधारे प्रोबेट मिळणेकामी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. अर्जदारची ही मागणी न्यायोचीत आहे काय ते पाहण्यापूर्वी प्रोबेट संदर्भातील कायद्याची तरतूद पाहणे गरजेचे आहे.

**८)** भारतीय उत्तराधिकार अधिनियम, १९२५ अंतर्गत प्रोबेट मिळविण्यासाठी अर्ज करता येतो. अर्जदारच्या कथनाप्रमाणे अर्जामध्ये दाखल केलेली मिळकत ही कै. तातोबा भुजगोंडा पाटील यांच्या मालकीची मिळकत आहे. कै. तातोबा भुजगोंडा पाटील याने त्याच्या हयातीमध्ये अर्जदारांस मिळकत मृत्युपत्राने देवू केली आहे. कै. तातोबा भुजगोंडा पाटील हे दि.०५/०८/१९९८ रोजी मयत झाले हे सिध्द करण्यासाठी अर्जदारने कै. तातोबा भुजगोंडा पाटील यांचा मृत्यु दाखला नि.क्र.३ सोबत अ.नं. २ वर दाखल केलेला आहे. ते पाहता कै. तातोबा भुजगोंडा पाटील हे दि.०५/०८/१९९८ रोजी चंदुर ता. हातकणंगले येथे मयत झाल्याचे दिसून येते. तसेच, प्रकरणात दाखल नि.क्र.३ सोबत अ.नं. ४ कडील ७/१२ चे उता-यामध्ये नमूद स्थावर मिळकतीचा गट नं. १९५/अ व भुखंड क्र. ७८ क्षेत्र १३९ चौ.मी. यावर तातोबा भुजगोंडा पाटील यांच्या नावची नोंद लागल्याचे दिसते.

९**)** अर्जदारांनी कै. तातोबा भुजगोंडा पाटील यांनी त्यांच्या हक्कात मृत्युपत्र करुन दिले असून त्यांच्या नावे प्रोबेट मिळणेकामी संबंधीत व्यक्तिंचे कांही आक्षेप असल्यास असे आक्षेप न्यायालयापुढे येण्याच्या उद्देशाने दि.१७/०२/२०२६ रोजीच्या दैनिक नवसंदेश या वृत्तपत्रात जाहीरनामा (नि.क्र.६) प्रसिध्द करुन संबंधिताकरवी आक्षेप मागविले होते. तथापि, अर्जदारच्या प्रस्तुत अर्जातील मागणी संदर्भात कोणीही आक्षेप अगर हरकत आजतागायत घेतलेली नाही. अर्जदारतर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदारांचा पुरावा हा अबाधित व विना आव्हानीत राहिलेला आहे.

१०**)** प्रस्तुत प्रकरणात अर्जदारतर्फे एकंदरीत आलेला तोंडी व कागदोपत्री पुरावा पाहता कै. तातोबा भुजगोंडा पाटील यांचे मृत्युपत्राविषयी कोणीही कांहीही आक्षेप घेतल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे या मृत्युपत्रावर विश्वास ठेवून त्याचे बारकाईने अवलोकन केले असता सदरचे मृत्युपत्र हे कै. तातोबा भुजगोंडा पाटील यांनी अर्जदारांची नावे स्वेच्छेने त्यात नमूद स्थावर मिळकती संदर्भात करुन ठेवलेले मृत्युपत्र आहे हे शाबीत होते.

११**)** त्यामुळे आता अर्जदार कै. तातोबा भुजगोंडा पाटील यांनी त्यांच्या नावे करुन ठेवलेल्या दि. २६/११/१९९७ रोजीच्या स्थावर मिळकती संदर्भात करुन ठेवलेल्या मृत्युपत्राआधारे प्रोबेट मिळण्यास पात्र ठरतात काय, हे पाहणे महत्वाचे ठरेल.

१२**)** भारतीय उत्तराधिकार अधिनियम, १९२५ मधील कलम २१३(१ व २) सह कलम ५७ ची तरतुद, मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या 'पी.पी. शर्मा (सिव्हील रेफरंस नं.१/२०१७)' यातील न्यायनिवाडा, इ. पाहता मृत्युपत्रव्यवस्थापक किंवा उत्तरदानग्राही करीता हक्कप्रस्थापित होण्यासाठी सक्षम अधिकारितेच्या न्यायालयाने मृत्युपत्रासंबंधी प्रोबेट देणे संबंधीचे अधिकार प्रस्तुत न्यायालयास आहेत.

१३**)** प्रस्तुत प्रकरणातील मृत्युपत्र पाहता, ते मु.पो. चंदुर ता. हातकणंगले, कोल्हापूर येथे तयार करण्यात आलेले असून त्यात नमूद असलेली स्थावर मालमत्ता इचलकरंजी येथील असल्याचे स्पष्ट होते. सबब, कलम ५७(ख) मधील तरतुदीनुसार सदर मृत्युपत्रातील स्थावर मिळकतीच्या संदर्भाने प्रोबेट देणे अनिवार्य असून ते देण्याविषयीचे अधिकार या न्यायालयास असल्याचे स्पष्ट होते.

१४**)** त्यामुळे वरील कायदेशीर तरतुद व अर्जदाराचा याकामी आलेला एकंदरीत तोंडी व कागदोपत्री पुरावा पाहता मृत्युपत्रात नमूद स्थावर मिळकती संदर्भात अर्जदारांस त्यांच्या मागणीप्रमाणे प्रोबेट देणे न्यायसंगत ठरेल. त्यामुळे अर्जदार त्यांच्या नावे प्रोबेट मिळण्याच्या अनुतोषास पात्र ठरतात. सबब, मुद्दा क्र.१ व २ चे उत्तर मी होकारार्थी देते.

<u>मुद्दा क्र.३ करिता</u> **-**

१५**)** वर केलेले विवेचन आणि विश्लेषणावरुन मुद्दा क्र.३ चा निष्कर्ष म्हणून मी पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

<u>आ दे श</u>

| | |
|---|---|
| १. | प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात येतो. |
| २. | अर्जदार क्र.१ व २ च्या नावे दि. २६/११/१९९७ रोजी कै. तातोबा भुजगोंडा पाटील यांनी केलेल्या मृत्युपत्राबाबत अर्जदारांनी (अनुच्छेद १० परिशिष्ठ I, महाराष्ट्र न्यायालय शुल्क अधिनियम १९५९) नुसार योग्य ती न्यायालयीन फी भरावी. |
| ३. | अर्जदारने वर नमूद केल्याप्रमाणे योग्य ती न्यायालयीन फी भरल्यानंतर (भारतीय वारसाहक्क कायदा, १९२५ चे कलम २८९ आणि परिशिष्ठ VI) नुसार विहीत नमुन्यात अर्जदारांचे नावे प्रोबेट दाखला देण्यात यावा. |
| ४. | या अर्जाचा खर्च अर्जदार यांनी स्वतः सोसण्याचा आहे. |

**(**न्यायनिर्णय खुल्या न्यायदान कक्षात घोषीत करणेत आला**.)**

सही**/-**
**(**एम**.**एस**.**गावडे**)**
५वे सह दिवाणी न्यायाधीश क**.**स्तर**,**
इचलकरंजी

दिनांक **-**१०**/**०८**/**२०२६**.**
ठिकाण**-** इचलकरंजी